# तरुणांनी उद्योगांची मुहूर्तमेढ रोवावी

म. टा. प्रतिनिधी, नाशिक




अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी उद्योगांची कास धरावी. नोकरीवरील अवलंबित्व सोडून तरुणांनी उद्योगाची मुहूर्तमेढ रोवावी. त्यासाठी सरकारच्या वतीने स्टार्ट अप इंडिया, मेक इन इंडियासारखे उपक्रम सहकार्य करतील. याच मार्गाने भारतीय अर्थव्यवस्था सबळ होऊन देश आर्थिक महासत्ता होईल, असा आशावाद विभागीय महसूल आयुक्त एकनाथ डवले यांनी व्यक्त केला.

के. के. वाघ शिक्षण संस्था संचालित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन कॉलेज आणि इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन कॉलेज चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने अभियंता दिन नुकताच पार पडला. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डवले बोलत होते. यावेळी त्यांनी स्टार्ट अप इंडिया व मेक इन इंडिया यातील फरक समजावून सांगताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील भारत साकार करण्यासाठी या उपक्रमाची गरज व्यक्त केली. याप्रसंगी आपल्या भाषणात नाशिकमधील उद्योजक सल्लगार डॉ. ओमप्रकाश कुलकर्णी यांनी भारताचे महान अभियंता सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या कार्याचा गौरवपूर्वक उल्लेख केला. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकाता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी संस्थेच्या वतीने पीएच.डी.धारक, शोधनिबंध सदर केलेल्या शिक्षकांचा, तसेच आपापल्या विषयांतील विशिष्ट कार्यपूर्ती करणाऱ्या शिक्षकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**विभागीय आयुक्त डवले यांचे आवाहन**

या कार्यक्रमाच्या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, संगणक विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने व्यासपीठावर होते. याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. ए. एस. पाटील यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्नेहल चौधरी व स्वाती पवार यांनी केले. डॉ. एस आर. गांगुर्डे यांनी आभार मानले. डॉ. एस. एम. कमलापूर व प्रा. पी. एस. विसपुते यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

महाराष्ट्र टाइम्स 10/10/2016

K.K. WAGH INSTITUTE OF ENGINEERING EDUCATION & RESEARCH • NASHIK-03 • LIBRARY

गांवकरी. 10/10/16

# अभियंत्यांनी उद्योजक बनावे : डवले



। नाशिक ।

के. के. वाघ शिक्षण संस्था संचालित के.के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालय आणि इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन कॉलेज चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने अभियंता दिन समारंभ नुकताच झाला. त्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय आयुक्त एकनाथ डवले व उद्योजक सल्लागार डॉ. ओमप्रकाश कुलकर्णी उपस्थित होते. के.के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन म हाविद्यालयात अभियंता दिनानिमित्त शिक्षक सत्कार समारंभाप्रसंगी बोलताना डवले यांनी स्टार्ट उप इंडिया व मेक इन इंडिया यातील फरक समजावून सांगताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील भारत साकार करण्यासाठी या उपक्रमाची गरज प्रतिपादन केली. याप्रसंगी अभियांत्रिकी शिक्षकांना आवाहन केले की, आपण विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षण देऊन उद्योजक बनवावे जेणे करून उद्याची भावी पिढी नोकरीवर विसंबून न राहता जास्तीत जास्त व्यवसाय स्वावलंबनात प्रवेश करेल आणि स्टार्टअप इंडिया ते मेक इन इंडियात भविष्य घडवतील. त्या योगे भारतीय अर्थव्यवस्था सबळ होऊन आपला देश हा आर्थिक महासत्ता होईल. या प्रसंगी आपल्या भाषणात नाशिक मधील उद्योजक सल्लगार डॉ. ओमप्रकाश कुलकर्णी यांनी भारताचे महान अभियंता सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांच्या कार्याचा गौरवपूर्वक उल्लेख करून विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकाता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी संस्थेच्या वतीने पी एच. डी. धारक, शोध निबंध सदर केलेल्या शिक्षकांचा, तसेच आपआपल्या विषयांतील विशिष्ठ कार्यपूर्ती करणा ऱ्या शिक्षकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाच्या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. बाळासाहेब वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, प्राचार्य डॉ. नांदूरकर, संगणक विभागप्रमुख डॉ. साने व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. ए. एस. पाटील यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. स्नेहल चौधरी व स्वाती पवार यांनी केले. डॉ. एस आर. गांगुर्डे यांनी आभार प्रदर्शन केले. डॉ. कमलापुर व प्रा. विसपूते यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

K.K. WAGH INSTITUTE OF ENGINEERING EDUCATION & RESEARCH • NASHIK-03 •
LIBRARY